MHKO160003072019

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४४/२०१९, निशानी क्र २९</u>

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा, हक्कज्ञापन आणि निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा दाखल असताना प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम केलेले नव्हते. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी १ व ७ यांनी ते दावा मिळकतीमध्ये बांधकाम करणार नाहीत असे हमीपत्र दिले होते, परंतू न्यायालयास उन्हाळयाच्या सुट्टया सुरू झाल्यानंतर प्रतिवादी नं १ यांनी दवा मिळकतीमध्ये त्यांच्या घराकडील बाजूने म्हणजे दावा मिळकतीचे पूर्वेस काही जागेमध्ये पत्र्याचे शेडचे बांधकाम दादागिरीने केले आहे. प्रतिवादी नं १ यांनी दावा मिळकतीमध्ये केलेले शेडचे बांधकाम आणि आरसीसी स्वरूपातील जीना अंदाजे दहा फूट पूर्व-पश्चिम आणि वीस फूट दक्षिणोत्तर असे अतिक्रमण आहे. वादी यांना वर नमूद अतिक्रमणाबाबत असलेल्या घटना त्यांचे वादपत्रामध्ये दाखल करणे आवश्यक झाल्यामुळे त्यांनी हा प्रस्तुतचा दुरूस्ती अर्ज दाखल केला आहे. वादी हे प्रस्तुत अर्जाद्वारे वादपत्राचे मुळ कथनामध्ये, आकारणी कथनामध्ये आणि विनंती कथनामध्ये दुरूस्त करू इच्छीत आहेत. वादी यांनी वर नमूद कारणांवरून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा आणि अर्जामध्ये नमूद दुरूस्ती वादपत्रामध्ये करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये अर्जातील मजकूर नाकारला आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार वादी अर्जामध्ये कथन करतात ते बांधकाम दावा दाखल करण्यापूर्वीच प्रतिवादी यांनी पूर्ण केले आहे आणि तसा उल्लेख त्यांचे कैफियतीमध्येदेखिल आहे. वादी यांनी जाणूनबुजून प्रतिवादी यांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. वादी यांचे प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा आणि चुकीचा आहे.

प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत आहे. प्रतिवादी यांनी वर नमूद कारणांवरून अर्ज रक्कम रूपये दोन हजार खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. मी वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादी आणि प्रतिवादी यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी अर्जामध्ये दावा प्रलंबित असताना प्रतिवादी नं १ यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून बांधकाम केले आहे, त्यामुळे त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. या उलट, प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये त्यांचे बांधकाम दावा दाखल करण्यापूर्वीच पूर्ण झालेले होते, या घटनेची माहिती वादी यांना होती असे कथन केले आहे. वादी आणि प्रतिवादी यांचे वर नमूद परस्परविरोधी कथनावरून प्रतिवादी यांचे बांधकाम निश्चित कधी झाले आहे आणि ते अतिक्रमणामध्ये आहे का ह्या घटना गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रस्तुतची दुरूस्ती आवश्यक असल्याचे स्पष्ट होत आहे. वादी यांचे सदर नियोजित दुरूस्तीचे स्वरूप पाहिले असता ते त्यांचे वादपत्राशी सुसंगत असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे, सदरची दुरूस्ती मंजूर झाल्यास दाव्याचे मूळ स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही ही घटना स्पष्ट होत आहेत. तसेच, नियोजित दुरूस्तीचे स्वरूप पाहिले असता सदरची दुरूस्ती ही वादी आणि प्रतिवादी यांचे दरम्यानचा वाद निकाली करण्यसाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

०१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२ वादी यांना अर्जामध्ये नमूद केलेली दुरूस्ती वादपत्रमध्ये करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांचे आत सदरची दुरूस्ती करावी आणि दुरूस्त वादपत्राची प्रत न्यायालयामध्ये दाखल करावी.

सही/-

दिनांक ०३/१२/२०२१

( एच आर पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी